# सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती

शासकीय तंत्र निकेतन परीसर, गाडगेनगर अमरावती

Email:- roamravati.dte@gmail.com, ati_jdroamt@sancharnet.in internet-http://www.jdroamt.org

Phone:- ०७२१-२५७३०२७, २५७२५७७ Fax No.-०७२१-२६६१४५३


तात्काळ/महत्वाचे

क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१६/2112

दि. ३/६/२०१६ 3 JUN 2016

प्रति,

प्राचार्य,
शासकीय/शासकीय अनुदानित/विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औ.नि.शा.महाविदयालये/तंत्रनिकेतन
(अकोला/बुलढाणा/वाशिम/यवतमाळ जिल्हयातील सर्व संस्था)

विषय:- सन २०१६ मधील पावसाळयात दि. १ जूलै ते ७ जुलै २०१६ या वनमहोत्सव कालावधीत दिनांक १ जुलै २०१६ हया दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करणेबावत.

संदर्भ:- उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क.७६-२०१६/ आस्था-२ दि. २७/४/२०१६

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सन २०१६ चे पावसाळयात दि. १ जूलै ते ७ जुलै २०१६ या वनमहोत्सव कालावधीत शासन निर्णयात नमूद केल्यानुसार दिनांक १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी संस्थेचे परिसरात ५० रोपांची लागवड करण्याचे उदिष्ट ठरवून दिलेले आहे. या संदर्भात दि.२.६.२०१६ रोजी मा. आयुक्त अमरावती यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत विभागीय स्तरावरील बैठकीत तात्काळ कार्यवाहीचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

करीता आपले संस्थेचे परिसरात वृक्ष लागवड करण्याकरीता दि.८ जून २०१६ पर्यत खडडे खोदणे, दि. २५ जून २०१६ पुर्वी सामाजीक वणीकरण यांचेकडून रोपे उपलब्ध करुन घेणे, दि.१ जुलै २०१६ रोजी सकाळी ८ ते सायकाळी ५ वाजेपर्यत एकाच दिवशी वृक्ष लागवड करणे या बाबतचे नियोजन संस्था स्तरावर करावे. या बाबत जिल्हास्तरावर सामाजिक वणीकरण व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडून बैठका आयोजीत करुन कार्यवाही करण्याबाबत आपणास कळविण्यात आलेले असल्याचे बैठकीत सांगीतले आहे.

करीता आपण वृक्ष लागवडीकरीता खडडे खोदण्याचे काम दि.८ जून २०१६ पूर्वी पूर्ण करुन त्या बाबतचा अहवाल संबंधीत जिल्हयातील शासकीय संस्थांचे प्राचार्य यांचेकडे सादर करावा व रोपांचे मागणी करीता संबंधीत जिल्यातील सामाजिक वणीकरण यांचे कार्यालयात मागणी नोंदवावी. प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, मुर्तीजापूर, वाशिम, खामगांव, यवतमाळ यांना कळविण्यात येते की, आपले जिल्यातील सर्व संस्थांकडून प्राप्त विहित प्रपत्रातील एकत्रित माहितीचा अहवाल इमेलव्दारे या कार्यालयास दि.१०.६.२०१६ पूर्वी सादर करावा.

सहपत्र:- १) शासन परिपत्रक
२) माहिती सादर करावयाचे विहित नमूना प्रपत्र

(डी.एन.शिंगाडे)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रतिलिपी:- प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, मुर्तीजापूर/वाशिम/खामगांव/यवतमाळ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

**सन २०१६ मधील पावसाळयात दिनांक १ जुलै ते ७ जुलै, २०१६ या वनमहोत्सव कालावधीत दिनांक १ जुलै, २०१६ ह्या दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.७६-२०१६/आस्था-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०१६.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: सावनि-२०१५/प्र.क्र.१३१/फ-११, दि. ३१.०३.२०१६

परिपत्रक -

राष्ट्रीय वननिती, १९८८ मधील धोरणानुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन/ वनीकरण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य हे देशातील प्रगतीशील आणि अग्रगण्य राज्य आहे. राज्यातील ३०७ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ६१.३५ लाख हेक्टर जमीन वृक्षाच्छादित आहे. हे प्रमाण सर्वसाधारणपणे २० टक्के आहे. जागतीक तापमानात होत असलेली वाढ, वातावरणातील बदल, बदललेले निसर्ग आणि ऋतुचक्र, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी किंवा दुष्काळ या माध्यमातून गेल्या काही वर्षात निसर्ग आपल्याला जाणीव करुन देत आहे. पर्यावरणाचे असंतुलन, असमतोल, वाढते प्रदूषण आणि त्यातून होत असलेले पर्यावरणीय बदल ही यामागील महत्वाची कारणे आहेत. मानवी जीवनास या पर्यावरणीय बदलास सामोरे जावे लागत आहे.

२. वरील बाबीचा विचार करून शासनाचे विविध विभाग व जनतेच्या सहभागातून सन २०१६-१७ मधील पावसाळ्यात वनमहोत्सव कालावधीमध्ये दि. १ जुलै, २०१६ रोजी एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्याचे शासनाने ठरविले आहे. वैश्विक उष्णतेचे वाढणारे प्रमाण व हवामानातील बदल यांची तीव्रता व परिणामकारकता कमी करणे, पर्यावरणाचा समतोल, संतुलन, संवर्धन आणि सुरक्षा राखण्यासाठी वृक्ष आवरण वाढविण्याच्या कार्यक्रमाचा प्रभावीपणे उपयोग होणार आहे.

३. वर नमूद २ कोटी वृक्ष लागवडीपैकी वन विभाग/सामाजिक वनीकरण विभाग व वन विकास महामंडळ यांनी कमीत कमी १.५० कोटी (दीड कोटी) वृक्ष लागवड करणे व उर्वरित ५० लक्ष वृक्ष लागवड इतर विभागामार्फत करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

४. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील असलेल्या कार्यालये, विद्यापिठे, महाविद्यालये, संशोधन संस्था इत्यादी ठिकाणी वृक्ष लागवड करणे शक्य आहे. त्यानुसार या विभागाच्या अधिपत्याखाली वृक्ष लागवडीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. प्रत्येक कार्यालयांच्या परिसरात - २० रोपे.
२. विद्यापीठाच्या परिसरात प्रत्येकी - १०० रोपे.
३. महाविद्यालयांच्या परिसरात प्रत्येकी - ५० रोपे.
४. औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रत्येकी - २० रोपे

५. वरील स्थळांच्या व्यतिरिक्त वृक्ष लागवडीसाठी आणखी स्थळे शक्य असल्यास निश्चित करण्यात यावीत. यासाठी विभागाच्या यंत्रणेबरोबरच स्वंयसेवी संस्था/अशासकीय संस्था, खाजगी उद्योजक, उद्योजकता सामाजिक दायित्व (CSR), सहकारी संस्था, विविध सामाजिक उपक्रमात अग्रेसर असणारी मंडळे व संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, आणि लोकप्रतिनिधी यांचा सहभाग घेण्यात यावा.

६. या कार्यक्रमाची प्रभावीपणे अमलबंजावणी होण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयामार्फत या कार्यक्रमाचे समन्वय व संनियंत्रण केले जाईल.

७. या कार्यक्रमाचे प्रभावीपणे ऑन-लाईन संनियंत्रण होण्यासाठी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( माहिती तंत्रज्ञान व धोरण ) वन भवन, नागपूर यांचेमार्फत आवश्यक आज्ञावल्या (software) विकसित केल्या